**वाचा** :- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन निर्णय क्रमांक .राभूअ-२०१३/प्र.क्र.३२/ल-१ महसूल व वन विभाग मंत्रालय,मुंबई-३२ दिनांक २३/०१/२०१३

क्र.रा.भु.अ.आ.का.-४/प्र.क. १४ /२०१४
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख ( महाराष्ट्र राज्य ),पुणे
यांचे कार्यालय ,पुणे.
दिनांक - २३ /०६ /२०१४

# परिपत्रक

**विषय :- ई-फेरफार आज्ञावली अंमलबजावणीसाठी पुर्वतयारीची कामे पुर्ण झाल्याचे तपासणीसाठी "तालुकास्तरीय ई-फेरफार पुर्व तयारी डाटा प्रमाणीकरण आज्ञावलीचा" वापर करणे व अंतीम डेटा सीडी पाठविणेची कार्यपध्दती.**

वाचा सदरील क्रमांक १ चे शासन निर्णयनुसार ई-फेरफार या आज्ञावलीची संपुर्ण राज्यात अंमलबजावणी दिनांक १/८/२०१४ पासुन करावयाची आहे. त्यासाठीची पुर्वतयारी संपुर्ण राज्यात अंतीम टप्प्यात आहे. ही सर्व कामे पुर्ण झालेली आहेत किंवा नाहीत हे संबंधीत तालुक्याचे तहसिलदार व डीबीए यांनी तपासून विहीत नमुन्यात प्रमाणपत्र दयावयाचे आहे.परंतु; झालेल्या कामाचे अहवाल (Report) जलदरित्या व अचुकपणे काढणेसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य),पुणे कार्यालयाने राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांचे मार्फत ऑफलाईन "**तालुका स्तरीय ई-फेरफार पुर्व तयारी डाटा प्रमाणीकरण आज्ञावली**" तयार केली आहे. या ऑफलाईन आज्ञावलीचा वापर केलेस अल्पावधीत काम पुर्ण आहे किंवा नाही याबाबतचा अचुक अहवाल तयार होतो. त्याच बरोबर प्रलंबीत असलेले कामाचा सविस्तर तपशिलाचा अहवाल आपोआप तयार होतो.

या आज्ञावलीचा वापर खालील प्रमाणे करावयाचा आहे.

**१) लॉग ईन होणे (Log in):-**

सर्व प्रथम डीबीए/तहसिलदार/डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट इत्यादी यांनी लॉगईन व्हावे. त्यासाठी त्यांचा सेवार्थ आयडी व पासवर्ड नमुद करावयाचा आहे.

**२) तालुकास्तरीय एकत्रीत माहीती :-**

लॉगईन झालेनंतर पुर्वतयारी मध्ये वापरावयाच्या अ) गोलू निरंक करणे ब) वापरकर्ता नोंदणी क) डेटा दुरूस्ती ड) फेरफाराची माहीती अद्यावत करणे इ) पिकांच्या पाहीतीचे अद्यावतीकरणे करणे. ई) डीबीए टूल कामाचा आढावा फ ) १०० % पीडीएफ तयार करणे या सर्व कामांचा तपशील संपुर्ण

/अपुर्ण /NA या प्रकारे स्क्रीनवर दिसतो. सर्व कामे पुर्ण केलेली असलेस संपूर्ण अन्यथा अपुर्ण असा तपशिल स्क्रीनवर दिसतो. प्रत्येक मोडयूलचे सद्यस्थितीचा सविस्तर तपशिल डॅश बोर्ड वरील मेनू बटन क्लीक करुन पाहता येतो.

**अ) गोलू निरंक करणे :-**

गोलू निरंक करणे या बटनावर क्लीक करताच टेबलचे नाव,एकूण गोलू रेकॉर्ड व दुरूस्ती केलेले रेकॉर्ड याचा अहवाल आपोआप तयार होतो. टेबलमध्ये गोलू अढळल्यास त्यांची संख्या दिसते न आढळलेस " या टेबल मध्ये गोलू आढळले नाही " असा संदेश दिसतो. त्याचा सविस्तर तपशिल मेनू मधून पाहून हे गोलु काढणेच्या आज्ञावलीव्दारे काढून टाकावे व पुन्हा अहवाल पहावा. " या टेबलमध्ये गोलु आढळले नाहीत " असा संदेश येईपर्यंत ही कार्यवाही करणे आवश्यक आहे.**हा अहवाल निरंक करणे आवश्यक आहे.**

**ब) वापरकर्ता नोंदणी (User Creation Report) :-**

ई-फेरफार आज्ञावलीचे वापराकरिता तलाठी व मंडल अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व गावे आज्ञावलीमधुन अलॉट करणे आवश्यक आहे. हे गावाचे अलॉटमेंट पुर्ण झालेले आहे किंवा नाही हे या अहवालातुन तपासता येते. या अहवालात प्रथमत: तलाठी व मंडल अधिकारी यांना अलॉट न झालेली गावे दिसतात. गाव अलॉट झाले नसलेस "नाही " असे दिसते. त्या नंतर वापरकर्ता नोंदणीचे एकत्रीत माहीतीमध्ये संबंधीत मंडल अधिकारी व तलाठी यांना अलॉट झालेल्या गावांचा गावांचे नांव, त्याचे जनगणना संकेतांक व चालू फेरफार क्रमांकासह एकत्रीत अहवाल तयार होतो. डीबीए ( Data base Adminier ) यांनी त्या त्या कार्यक्षेत्रातील अलॉट न केलेली गावे संबंधीत तलाठी / मंडल अधिकारी यांना अलॉट करुन अहवाल निरंक करावा.

**क) डेटा दुरुस्ती (Data correction Report ):-**

या पर्यायावर डाटा दुरुस्तीबाबतचे १ ते १५ अहवालांची माहीती मेळ बसलेले, मेळ न बसलेले व डेटामध्ये त्रुटी असलेले रेकॉर्डस यांचे सांख्यिकी माहीतीचा सद्यस्थिती अहवाल आपोआप तयार होतो.जे अहवाल निरंक नसतील ते यापुर्वी दिलेल्या सूचनां प्रमाणे डेटा दुरुस्ती आज्ञावलीव्दारे निरंक करावेत. **डेटा दुरुस्तीचा हा अहवाल निरंक असणे आवश्यक नाही.**

**ड) फेरफाराची माहीती अद्यावत करणे (Data Updation Report) :-**

या पर्यायावर क्लीक केलेस सर्व प्रकारचे फेरफारांची प्रकारनिहाय सांख्यिकी माहीती, आज्ञावलीत नोंदविलेल्या फेरफारांची संख्या व मंजुर केलेल्या फेरफारांची संख्या अशाप्रकारे अहवाल तयार होतो. या अहवालावरुन फेरफार नोंदणी व मंजूर करणेवर शिल्लक फेरफारांच्या सांख्यिकी माहीतीचा अहवाल अपोआप तयार होतो. या अहवालावरुन संगणकीकृत ७/१२ चे डेटामध्ये नोंदी अदययावत करणेवर प्रलंबीत कामाचा नेमका अंदाज येतो त्या आधारे कामाचे नियोजन करुन पुर्ण करावे **हा अहवाल निरंक असणे आवश्यक आहे.**

**इ) पिक पाहणी अद्यावत करणे (Crop Updation) :-**

या पर्यायावर क्लीक केलेवर गाव निहाय एकुण सर्व्हेनंबर व हंगामनिहाय अद्यावतीकरण करावयाचे कामाचे सद्यस्थितीची माहीती प्राप्त होते. यावरुन आद्यावत करणेवर शिल्लक कामाचा वर्षनिहाय तपशिल मिळतो.तो पाहून प्रलंबीत काम पुर्ण करावे. **हा अहवाल निरंक येणे आवश्यक आहे.**

ई) **डीबीए टूल कामाचा आढावा (DBA Report) :-**

डीबीए टूल हे डाटा दुरुस्ती आज्ञावलीची विस्तारीत आवृत्ती आहे. या टुलचा वापर करुन डाटा दुरुस्ती आज्ञावलीने केलेले कामाचे आणखी प्रमाणीकरण होते. दुबार डाटा असल्यास काढुन टाकता येतो. या पर्यायावर क्लीक केलेनंतर डाटा कॉलमला सुस्थीतीत आणले आहे काय, माहीती अनुक्रमांकानुसार लावली आहे काय, डुप्लकेट नोंदी काढल्या आहेत काय, टेबल स्ट्रक्चर तपासले आहे काय ? याची माहीती होय / नाही या स्वरुपात अहवाल तयार होतो.हा अहवाल डेटामधील टेबलनिहाय तयार होतो. हे काम DBA यांनी पार पाडणेचे असून हा अहवाल होकारार्थी असणे आवश्यक आहे.

**फ) १०० % पीडीएफ तयार करणे (PDF Generation Report ) :-**

डाटा करेक्शन व अपडेशनचे काम पुर्ण झालेनंतर डीबीए टूल वापरणेत येते. त्यानंतर सर्व गाव नमुना नंबर ७/१२ च्या प्रिंट घेवुन तपासणी करावयाची आहे. त्याकरिता PDF तयार करुन त्यानंतर प्रिन्ट करणेसाठी सर्व ७/१२ च्या पीडीएफ तयार झाल्या किंवा नाही याबाबतचे सांख्यिकी माहीतीचा अहवाल " १००% पीडीएफ तयार करणे " या पर्यायावर क्लीक केलेनंतर आपोआप तयार होते. यावरुन प्रलंबीत कामाचा अंदाज घेता येतो या अहवालात ज्या संबंधी युटीलिटी दिली आहे व त्यानंतर तयार केल्या नसतील त्या अहवालाचे आधारे खात्री करुन १००% पीडीएफ तयार करणेचे काम अपुर्ण असलेस पुर्ण करुन घ्यावे.

**ग) आज्ञावलीव्दारे अहवालाचे आधारे प्रमाणपत्र देणे :-**

वरिल प्रमाणे संबंधीत तालुक्याचे डीबीए, तहसिलदार यांनी पुर्व तयारीचे सर्व कामांची तपासणी या आज्ञावली मधून करावी प्रलंबीत कामे पुर्ण करुन घ्यावी व त्यांनतर ई-फेरफारसाठी त्यांचे तालुक्याचा डाटा परिपुर्ण असलेचे सोबतचे परिशिष्ठ -१ मधील विहीत नमुन्यात प्रमाणीत करावे.या प्रमाणपत्रातील सर्व बाबींची उत्तरे होकारार्थी असणे आवश्यक आहे.

**ढ)अंतीम डेटा सीडी सादर करणे:-**

तालुका निहाय अंतीम डाटा सीडी स्विकारणेसाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमि अभिलेख (म.राज्य)पुणे कार्यालयातील " **कार्यासन अधिकारी, रा.भु.अ.आ.का.-४** " यांची नियुक्ती करणेत आली आहे. सर्व डीबीए यांनी अंतीम डेडा सीडी तयार करतांना जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी यांच्या कडुन डेटाचा बॅकअप घेण्याची प्रक्रीया समजावून घ्यावी. व त्याप्रमाणे डेटाचा बॅकअप घ्यावा. अशा अंतीम डेटाची बॅकअप सीडी तयार करावी. तयार केलेली सीडी वरुन पुन्हा एकदा बॅकअप फाईल संगणकावर कॉपी करुन पहावी. त्यानंतर **अंतीम डेटाची बॅकंअप सीडी व विहीत नमुन्यातील अंतीम तपासणी प्रमाणपत्र संबंधीत डीबीए यांनी जमाबंदी आयुक्त कार्यालयातील नोडल ऑफीसर** यांचेकडे समक्ष सादर करावे. नोडल ऑफीसर व त्यांचे सहाय्यक यांचे कडुन प्रमाणपत्रातील तपशिल तपासून डाटा सीडी स्टेट डेटा सेंटरवर

अपलोड करणेसाठी राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांचे कडे पाठविणेत येईल. राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र,पुणे यांचे कडुन तालुकानिहाय प्राप्त डाटा स्टेट डेटा सेटर,मुंबई वर अपलोड करणेत येईल. त्यानंतर हा डाटा ऑनलाईन म्युटेशनसाठी उपलब्ध होईल.

सर्व संबंधीत अधिकारी यांनी वरील सुचनांचे काटेकोर पालन करणेचे आहे.

सोबत :- परिशिष्ठ -१ अंतीम तपासणी अहवाल संलग्न केला आहे.

( चंद्रकांत दळवी )
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमि अभिलेख (म.राज्य.) पुणे**

प्रत : मा.अप्पर मुख्य सचिव (महसुल) महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, यांना माहितीसाठी.

प्रत : विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत :- राज्य सुचना विज्ञान अधिकारी,मुंबई यांना माहीतीसाठी

प्रत : जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : उप महानिदेशक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांना माहिती व कार्यवाहीसाठी .

प्रत: डिस्ट्रीक्ट डोमेन एक्सपर्ट (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत: जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी (सर्व ) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत : तहसिलदार (सर्व) यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

# परिशिष्ठ -१

## अंतीम तपासणी अहवाल प्रमाणपत्र

जिल्हा :- तालुका :-

| अं.न. | ऑनलाईन कामाचा तपशिल | समरी अहवालां प्रमाणे काम पुर्ण आहे का? (होय / नाही) | संबंधीत ऑनलाईन डाटा प्रमाणीकरण आज्ञावली अहेवाल जोडला (आहे / नाही) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | डाटा कनर्व्हजन | | |
| २ | डाटा क्लिनींग | | |
| ३ | सेवार्थ आयडी ,रजिस्ट्रेशन (डीडीई, डीबीए,मंडल अधिकारी, तलाठी) | | |
| ४ | डाटा करेक्शन | | |
| ५ | डाटा अपडेशन | | |
| ६ | पीक नोंदी अपडेशन | | |
| ७ | डीबीए टूल चा वापर | | |
| ८ | सर्व गावांच्या १००% पीडीएफ तयार करणेत आल्या आहेत काय ? | | |
| ९ | सर्व गावांच्या प्रींट पीडीएफ प्रिंट विहीत परिमानात तपासून आवश्यक त्या दुरुस्त्या करणेत आल्या आहेत काय ? | | |

**टिप :- स्तंभ क्र.-३ मधील सर्व उतारे " होय " अशी होकारार्थी येणे आवश्यक आहे.**

प्रमाणित करणेत येते की, वर नमुद १ ते ९ मुद्यांची मी व्यक्तीश: तपासणी केलेली आहे. पुढे मी असेही प्रमाणीत करतो की, वरील अहवालात दर्शविलेली माहीती ही हस्तलिखीत मुळ रेकॉर्ड प्रमाणे बरोबर असलेची खात्री केली आहे.

**डीबीए**
**तथा नायब तहसिलदार**
**तालुका --------- जिल्हा --------**

**तहसिलदार**
**तालुका ------**
**जिल्हा ------**